**एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन**

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,

डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

**अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा**

**प्रश्नपत्रिका एक—विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण**

रविवार, दिनांक २४ जून, २०१८

[**वेळ** : सकाळी १०.३० ते दुपारी १.१५]

(तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून)

(**एकूण गुण** : १००)

---

**सूचना** :- प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

**गुण**

**प्रश्न क्र.१** खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर सुमारे २० ते २५ ओळींत लिहा :- **१०**

(अ) प्रभाकर पेंढारकर यांनी केलेले हिमालयाचे वर्णन तुमच्या शब्दांत लिहा.

(ब) लंडन आणि अमेरिका भेटीतील कोणते दोन अनुभव लेखिका शांता शेळके यांनी सांगितले आहेत ?

(क) विद्या बाळ यांच्या मते सण आणि उत्सव साजरे करताना कोणत्या गोष्टींची काळजी घेतली पाहिजे ?

**प्रश्न क्र.२** पाठांच्या आधारे खालीलपैकी **पाच** प्रश्नांची उत्तरे १० ते १५ ओळींत लिहा :- **२५**

(अ) 'अपूर्वभेट' या पाठाच्या आधारे स्वामी विवेकानंद आणि राजा रवी वर्मा यांच्या भेटीचे वर्णन करा.

(ब) 'बाबूजी' या पाठाच्या आधारे केशवच्या घराचे वर्णन करा.

(क) 'वारूळ' या पाठामधील नागिणीच्या पोराला माणसासारखे घर का बांधायचे होते ?

(ड) 'ईद' या सणाच्या दिवशी लेखिका आशा आपराद यांच्या घरी वातावरण कसे असे ?

(इ) 'माणुसकीचा झरा' या पाठाच्या आधारे बाबा आमटे यांचे व्यक्तिमत्त्व स्पष्ट करा.

(फ) लेखक बी.जी.वाघ यांच्या मते निसर्ग आणि माणूस यांत कोणता भेद आहे ?

(ग) कवी नारायण सुर्वे कविता वाचून दाखवत असताना कृष्णाबाई सुर्वे गप्प का बसत असत ?

(ह) लेखक आनंद यादव यांनी पंढरपूर गावाची कोणती वैशिष्ट्ये सांगितली आहेत ?

कृ.मा.प.

गुण

प्रश्न क्र.३ खालीलपैकी कोणत्याही **तीन** प्रश्नांची उत्तरे १० ते १५ ओळींत लिहा :- १५

(अ) संतांच्या सान्निध्यात मिळणाऱ्या आनंदाचे वर्णन संत सेना महाराज कसे करतात ?

(ब) 'भौतिक श्रीमंतीपेक्षा हृदयाची श्रीमंती ही अधिक महत्त्वाची असते' हे कवी सुर्यकांत खांडेकर यांनी कसे स्पष्ट केले आहे ?

(क) 'प्रलय' या कवितेत कवीला कोणता प्रलय अपेक्षित आहे ? का ?

(ड) अनिल पाटील यांनी गावातील निसर्गाचे वर्णन कसे केले आहे ?

(इ) 'एकत्वाचे गीत महान' या कवितेत कवयित्रीने भारत देशातील वेगळेपण कसे वर्णन केले आहे.

प्रश्न क्र.४ खालीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा :- १०

(अ) मन दुखावले जाणे.

(ब) गोडी चाखणे.

(क) निगा राखणे.

(ड) सहभागी होणे.

(इ) समाधान वाटणे.

(फ) परिश्रम करणे.

(ग) ध्यास घेणे.

(ह) आर्जव करणे.

प्रश्न क्र.५ खालील मराठी शब्दसमूह आणि त्यांचे इंग्रजी अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवा. १०

| **'अ'** गट | **'ब'** गट |
|---|---|
| (अ) हुतात्मा होणे. | (१) To implement |
| (ब) मनावर ठसा उमटणे. | (२) To warn |
| (क) गट-तट असणे. | (३) To start crying |
| (ड) उच्छाद मांडणे. | (४) To persuade |
| (इ) जरब बसवणे. | (५) To create a strong base |
| (फ) अंमलबजावणी करणे. | (६) To be highly impressed |
| (ग) पाया मजबूत करणे. | (७) To become a martyr |
| (ह) रडू फुटणे. | (८) Find a way out |
| (य) मार्ग शोधणे. | (९) To have differences of opinion |
| (र) समजूत घालणे. | (१०) To trouble |

गुण

**प्रश्न क्र.६** (अ) खालीलप्रमाणे कोणत्याही **पाच** शब्दांचे लिंग बदला. ५

(१) मित्र (२) भाऊ (३) विद्वान
(४) ताई (५) नवरा (६) मुलगा
(७) आई (८) शिक्षक

(ब) खालीलप्रमाणे कोणत्याही **पाच** शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा. ५

(१) भरपूर (२) सोय (३) कंजूष
(४) दुर्दैवी (५) सुंदर (६) लक्ष
(७) जबाबदार (८) पवित्र

**प्रश्न क्र.७** (अ) खालीलप्रमाणे कोणत्याही **पाच** शब्दांपासून विशेषण तयार करा. ५

(१) विभाग (२) मास (३) शरीर
(४) कल्पना (५) सुदैव (६) वाचन
(७) पुराण (८) वर्ष

(ब) कंसातील सूचनांनुसार बदल करून वाक्ये पुन्हा लिहा. ५

(१) तुमचे बाळ खूपच गोंडस आहे. (उद्गारार्थी करा.)
(२) माणसांकडून प्राण्यांनी काही शिकायला नको का ? (विधानार्थी करा.)
(३) नेत्यांच्या आज्ञेनुसार शाळा बंद पाडली. (आज्ञार्थी करा.)
(४) वकिलीत मन रमेना. (प्रश्नार्थी करा.)
(५) त्याचे खूपच वाईट झाले. (उद्गारार्थी करा.)

**प्रश्न क्र.८** कंसात दिलेल्या पर्यायांमधून वाक्यांतील रिकाम्या जागी योग्य शब्दसमूहाची निवड करा. १०

(साधना आमटे, अकरा, वसंतऋतुतल्या, स्वातंत्र्य, बाबूजी, मुंग्या, दरगाह, संस्कार, शिक्षण, फलक)

(अ) ...........करावे लागत नसतात, तर शाळेचे वातावरण व शिक्षकांचे आचार-विचार यांतून आपोआप ते होतात.
(ब) रंगशाळेतल्या चित्रसोपानावर कोरा...........होता.
(क) आशा आणि आकांक्षा, ........... आणि ज्ञानही !
(ड) आपल्या पक्ष्यांचा थवा...........सुखावणाऱ्या वाऱ्यावर उडायला आणि झुलायला हवा.
(इ) ...........सगळ्या स्तब्ध होऊन ऐकत होत्या त्या नागिणीचे शहाणपण.
(फ) आदिलशहा बादशहाने हा...........या संतपुरुषाच्या कबरीवर बांधला आहे.
(ग) पतीनं घेतलेल्या, स्वीकारलेल्या व्रतासाठी समपर्ण करणारी........... सर्वांची ताई झाली.
(ह) येणारी प्रत्येक पिढी ही मुक्त आणि ...........असली पाहिजे
(य) 'माझे विद्यापीठ'ला एकूण ...........पुरस्कार मिळाले.
(र) ........... आमच्या गावातलं सोज्वळ व्यक्तिमत्व.

# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

**अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा**

**प्रश्नपत्रिका दोन—सुसंगत लेखन व अनुवाद**

रविवार, दिनांक २४ जून, २०१८

[**वेळ** : दुपारी १.४५ ते सायंकाळी ४.१५]

(**एकूण गुण** : १००)

---

**सूचना** :- प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केलेले आहेत.

**गुण**

**प्रश्न क्र.१** खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे २० ओळींचा निबंध लिहा. **२०**

(अ) संगणक साक्षरता — काळाची गरज.

(ब) 'पैसा' बोलता है

(क) मराठी चित्रमालिकांचे बदलते स्वरूप.

(ड) खेड्यांकडे चला.

(इ) मराठी शाळांची दुरावस्था.

**प्रश्न क्र.२** खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे २० ओळींत तुमचे विचार लिहा. **२०**

(अ) शहरातील वाहन पार्किंगची समस्या.

(ब) प्लॅस्टिक बंदी — घराघरातून सहकार्य आवश्यक.

(क) आय.पी.एल. क्रिकेटची गुणवत्ता की पैशाची महासत्ता ?

(ड) राजकारणातील सौदेबाजी लोकशाहीला घातक

(इ) आम्हाला आदर्शांची गरज आहे ?

**प्रश्न क्र.३** खालीलपैकी कोणत्याही **दोन** बाबी तयार करा :- **३०**

(अ) सुका कचरा व ओला कचरा वेगळाच घंटागाडीत टाकावा यासाठी प्रसिद्धीपत्रक तयार करा.

(ब) सरकारी कार्यालयात मोबाईल चार्जर वापराची बंदी यासाठी पत्रक तयार करा.

(क) 'मी स्वच्छ. कारभार स्वच्छ' या विषयावर भाषण तयार करा.

(ड) वित्त विभागाच्या रिक्त झालेल्या पदाचा अतिरिक्त कार्यभार आपल्या शाखेव्यतिरिक्त इतरांकडे सोपवत असल्याबाबतचे आदेश पत्र तयार करा.

कृ.मा.प.

गुण

**प्रश्न क्र.४** खालीलपैकी कोणत्याही **दहा** पदनामांचे मराठी पर्याय लिहा. १०

(१) Chief Justice
(२) Sub Inspector
(३) Engineer
(४) Director
(५) Clerk
(६) Dean
(७) Collector
(८) Toll
(९) Financial Crises
(१०) Certified Auditor
(११) Editor
(१२) Raw Material

**प्रश्न क्र.५** खालीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्यांचे मराठीत भाषांतर करा. १०

(१) I have no instruction.
(२) Please, do the needful.
(३) Forworded with compliments for necessary action.
(४) The office will bear the conveyance.
(५) This amount is not refundable.
(६) Department may see the proceeding note with reference to their query.
(७) This form is not found suitable.

**प्रश्न क्र.६** खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा :- १०

Almost Half of the patients going to the tertiary care hospitals complained of Diabetes and Hypertention. Mumbai has four tertiary care level hospitals. Psychiatric disorders were the most common complaints at these hospitals, found the study.